RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ३०

दि. २० मे २०२६, वार : बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## देशाला 'ऊर्जा संपन्न' राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्राचे बळ मिळणार : मुख्यमंत्री

- राज्य शासनाचा अणुऊर्जा निर्मितीसाठी कंपन्यांशी सामंजस्य करार
- २५, ४०० मेगावॅट अणुऊर्जा व १,२३,५०० रोजगार निर्मिती
- एकूण गुंतवणूक ६,५०,००० कोटी



**मुंबई/प्रतिनिधी** : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला ऊर्जा संपन्न राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड), अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे. बैठकीला पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यामध्ये स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीतून राज्य ऊर्जा निर्मितीमध्ये अधिक वेगाने प्रगती करणार आहे. ही गुंतवणूक केवळ ऊर्जा निर्मितीसाठीच लाभाची नसून त्यामुळे रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमी देशात अग्रेसर असणार आहे.

कंपन्यांनी सामंजस्य करार प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आणण्यासाठी गतीने कार्यवाही करावी. संबंधित कंपन्यांनी प्रकल्पाच्या जागांचे सर्वेक्षण करावे. या कामी राज्य शासनाचा संबंधित विभाग त्यांना सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

याप्रसंगी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व कंपन्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांमध्ये करारांचे आदान-प्रदान करण्यात आले.

**करारामुळे होणारी अणुऊर्जा व रोजगार निर्मिती**

अदानी पॉवर लिमिटेड कंपनी राज्यात १ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून ६ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती होईल. तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती व एक लाखाच्यावर रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच एनटीपीसी लिमिटेड १ लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये ५ हजार रोजगार निर्मिती होईल. ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) राज्यात २ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामधून पाच हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती आणि ३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. अशाप्रकारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्मिती आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक २०२६

**ठाणे/प्रतिनिधी** : मा. भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. हा कार्यक्रम निवडणुकीची सूचना प्रसिध्द करणे - २५ मे, २०२६ (सोमवार). नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची अंतिम तारीख - ०१ जून २०२६ (सोमवार). नामनिर्देशनपत्राची छाननी - ०२ जून, २०२६ (मंगळवार). उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख - ०४ जून, २०२६ (गुरुवार). मतदानाची तारीख - १८ जून, २०२६(गुरुवार). मतदानाची वेळ - सकाळी ०८.०० ते सायं. ४.००. मतमोजणी - २२ जून, २०२६ (सोमवार). निवडणूकांचे कामकाज पूर्ण करणे - २५ जून, २०२६ (गुरुवार), असा असल्याची माहिती ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी रुपाली भालके यांनी कळविले आहे.

## लातूरच्या ओजस्वी सुळ हिची एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये दमदार नोंद




**लातूर/प्रतिनिधी** :महाराष्ट्रातील लातूर शहराची दहा वर्षांची कन्या ओजस्वी राहुल सुळ हिने आपल्या अद्वितीय कौशल्याच्या जोरावर ''एशिया बुक ऑफ रेकॉर्ड''मध्ये नाव नोंदवत लातूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. हुलाहूप या कौशल्यप्रकारात तिने तब्बल १ तास ४२ मिनिटे १८ सेकंद अखंडपणे विविध प्रकारचे बदल करत रिंग खाली न पडू देता हा विक्रम आपल्या नावे केला आहे.

या विक्रमासाठी मोठ्या प्रमाणात कौशल्य, एकाग्रता, संयम, शारीरिक संतुलन आणि स्टॅमिना आवश्यक असतो. ओजस्वीने अतिशय आत्मविश्वासाने आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर हा पराक्रम साध्य केला आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीची अधिकृत नोंद ''एशिया बुक ऑफ रेकॉर्ड''मध्ये करण्यात आली आहे.

ओजस्वी ही लातूर येथील डॉ. ज्योती सुळ आणि डॉ. राहुल सुळ या दांपत्यांची कन्या असून, तिच्या यशामुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यासह महाराष्ट्रभरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विविध सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

दरम्यान, ओजस्वीची पुढील वाटचाल आता ''गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड''कडे सुरू झाली असून, आणखी मोठा विश्वविक्रम आपल्या नावे करण्यासाठी ती जोरदार तयारी करत आहे. तिच्या या जिद्दीला आणि मेहनतीला भविष्यात जागतिक स्तरावरही मोठे यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## मोठा फौजफाटा, परिसरात तणाव! वांद्र्यातील गरिबनगरवर चालला बुलडोझर, रेल्वेची तोडक कारवाई

**मुंबई :** मुंबईतील गरिब नगर बांद्रा पूर्व परिसरात पश्चिम रेल्वेकडून सकाळपासून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटवण्याची मोहीम सुरु करण्यात आली आहे. रेल्वे रुळांच्या सुरक्षेसाठी तसेच भविष्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी, अतिरिक्त रेल्वे सेवा सुरु करण्यासाठी ही करावई आवश्यक असल्याचे म्हणणे रेल्वे प्रशासनाचे आहे. या मोहिमेमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात सकाळपासून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून प्रशासन, पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दल हे संयुक्तरित्या कारवाई करत आहेत.

रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसारस, या भागातील कारवाई अचानक करण्यात आलेली नाही तर त्यासाठी थेट २०१७ पासून या संदर्भात कायदेशीर प्रक्रिया सुरु होती. त्यानंतर या प्रकरणात उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयानेही रेल्वेला या कारवाईसाठीची परवानगी दिल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळेच सर्व नियमानुसार अतिक्रमण हटवण्याचे हे काम सुरु असल्याचा दावा रेल्वेकडून करण्यात आलेला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून रेल्वे रुळांलगतच्या सुरक्षा क्षेत्रात अनेक अनधिकृत बांधकामे उभी आहेत, त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला होता तसेच भविश्यातील रेल्वे मार्गाचा विस्तार आणि अतिरिक्त रेल्वे सेवा सुरु करण्यासाठी ही सर्व जागा मोकळी करणे आवश्यक असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## गुरुवारी ठाण्यातील काही भागात २४ तास पाणी नाही

**ठाणे/प्रतिनिधी** : दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी जलसंपदा विभागासमवेत पाणीपुरवठा अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीतील निर्णयानुसार सद्यस्थितीत आंध्रा व बारवी धरणातील पाण्याची तूट तसेच पुढील हंगामात पावसाचे कमी प्रमाण लक्षात घेता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पाणी वापराचे नियोजन करण्यासाठी महामंडळामार्फत पाणी कपात करण्याचे प्रस्तावित आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत जांभूळ जलशुध्दीकरण केंद्रातील जलाशय येथे बारवी गुरूत्ववाहिनी क्र. १,२ व ३ वर वाहिन्यांचे उन्नतीकरण व तातडीचे देखभाल दुरूस्तीचे काम करण्यात येणार आहे. परिणामी गुरूवार दिनांक २१/०५/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजल्यापासून ते शुक्रवार दिनांक २२/०५/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत एकूण २४ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा -मानपाडा व वागळे (काही भागात) प्रभागसमिती मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो. सदर शटडाऊन कालावधीत ठाणे महानगरपालिकेअंतर्गत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ व ३१ चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समितीमधील सर्व भागामध्ये व वागळे प्रभाग समिती मधील रुपादेवी पाडा, किसननगर नं. २, नेहरुनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणीपुरवठा २४ तासासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची नागरिकांनी नोंद घ्यावी असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.

तरी सदर पाणी कपातीच्या कालावधीत पाण्याचा वापर काटकसरीने करावा असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## ठाणे महापालिकेतर्फे १५ जूनला परिमंडळ लोकशाही दिनाचे आयोजन

### ०१ जून २०२६ पर्यंत निवेदन सादर करण्याचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी** : नागरिकांच्या वैयक्तिक तक्रारींचा निपटारा तातडीने होण्यासाठी तालुकास्तरिय लोकशाही दिनाच्या धर्तीवर, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी परिमंडळ स्तरावरही लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार, सोमवार, १५ जून २०२६ रोजी परिमंडळ लोकशाही दिन होणार आहे. या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी आपली निवेदने ०१ जून पर्यंत सादर करण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपली निवेदने पुढील ठिकाणी सादर करावीत.

परिमंडळ १ - (कळवा, मुंब्रा, दिवा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, कळवा प्रभाग समिती कार्यालय, कळवा

परिमंडळ २ - (नौपाडा, वागळे प्रभाग समिती अंतर्गत, उपायुक्त कार्यालय, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

परिमंडळ ३ - (उथळसर, वर्तकनगर, लोकमान्य. सावरकरनगर, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

नागरिकांनी प्रथमतः परिमंडळ लोकशाही दिनात अर्ज दाखल करावेत. परिमंडळ लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास नागरिक महापालिका लोकशाही दिनामध्ये नियमानुसार १५ दिवस आधी आपली निवेदने सादर करू शकतील. नागरिकांनी परिमंडळ लोकशाही दिनासाठी आपली निवेदने संबंधित परिमंडळ कार्यालयात सादर करावीत.

## सातबारा न लावताच सरकारी जमिनीवरील घरांची दस्त नोंदणी

### कल्याण सह दुय्यम निबंधक कार्यालयातील बेकायदेशीर कामांची चौकशी करण्याचे आदेश

**ठाणे/प्रतिनिधी** : कल्याण तालुक्यातील खडेगोळवलीमधील सर्व्हे नंबर ४९ गुरुचरण असलेल्या सरकारी जमिनीवरील अनधिकृत चाळींचे बेकायदेशीरपणे खरेदी दस्त नोंदणी करण्यात आलेली आहे. यासाठी सात बारा उतारासह अन्य कागदपत्रांची पूर्तता न करता कल्याण येथील सह दुय्यम निबंधक वर्ग दोन मध्ये खरेदी विक्री खत तयार करण्यात आले आहेत.

याप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी सह जिल्हा निबंधक यांना दिले आहेत. भाजप कल्याण पूर्व मंडळाचे उपाध्यक्ष मारुती खबाले यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने या घोटाळ्याची चौकशी करण्याचे आदेश दिल्याने कल्याणच्या सह दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी धास्तावले आहेत.

मुख्यमंत्र्यांसह जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आलेल्या तक्रारीनुसार कल्याण तालुक्यातील खडेगोळवलीमधील सर्व्हे नंबर ४९ ही जमीन गुरुचरण आहे. या सरकारी जमिनीवरील अनधिकृतपणे चाळी उभारण्यात आलेल्या आहेत.

या चाळीतील खोलीचे ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग २ येथे कायम खरेदी विक्री करार दस्त क्रमांक १८०४८/२०२५ हा फक्त टॅक्स पावती, लाईट बिल, नळ बिल या कागदपत्रांवर नोंदविण्यात आला.

ही नोंदणी करताना सात बारा उतारा, आणि सर्व्हे नंबर नमूद केलेले नाही. सात बाराची प्रत देखील सदर दस्तात दाखल केलेली नाही. असे असतानाही बेकायदेशीपणे दस्त नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी खबाले यांनी १३ मार्च रोजी केली होती. त्याची गंभीर दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

## अमेरिकेत इस्लामिक सेंटरमध्ये गोळीबारात तिघांचा मृत्यू

वॉशिंग्टन : कॅलिफोर्नियातील सॅन दिएगो येथील इस्लामिक सेंटर कॅम्पसमधील मशिदीजवळ सोमवारी झालेल्या गोळीबारात तीन जण ठार झाले. हा हल्ला दोन अल्पवयीन बंदूकधाऱ्यांनी केल्याचा दावा केला जात आहे. त्यानंतर त्यांनी जवळच्याच रस्त्यावर स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली. माहिती मिळाल्यानंतर पोलीस इस्लामिक सेंटरमध्ये दाखल झाले आणि त्यांनी रहिवाशांना काही काळासाठी घरातच थांबण्याचा सल्ला दिला.

सॅन दिएगोचे पोलीस प्रमुख स्कॉट वॉल यांनी या घटनेला दुजोरा दिला.

वरिष्ठ पोलीस अधिकारी स्कॉट वॉल यांनी सांगितले की, जवळच एका गाडीत दोन संशयित हल्लेखोर मृतावस्थेत आढळले. संशयित १७ आणि १८ वर्षांचे आहेत. वॉल यांनी सांगितले की, या घटनेची द्वेषपूर्ण गुन्हा म्हणून चौकशी केली जात आहे. सॅन दिएगो येथील इस्लामिक सेंटरचे इमाम ताहा हसन यांनी लोकांना द्वेष सोडून सलोख्याने राहण्याचे आवाहन केले आहे.

## हमी भावाने सोयाबीन खरेदी केलेल्या फरकाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा

### सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र सरकाने म्हणजेच खरीप २०२५ मध्ये उत्पादीत झालेले सोयाबीन हमी भावाप्रमाणे पणन मंत्रालयामार्फत खरेदी केले होते, परंतु आजघडीला सोयाबीनच्या बाजार भावामध्ये मोठी वाढ झालेली आहे. हमी भावा अंतर्गत शेतकऱ्यांना ५,३२८ रुपये अदा केले होते., परंतु आजरोजी सोयाबीनचा बाजार भाव ८,००० रुपयापर्यंत पोहचलेला आहे.

सरकाने खरेदी केलेल्या भावावर २,७०० रुपये आजच्या तारखेमध्ये अतिरीक्त मिळत आहे.त्यामुळे फरकाची रक्कम सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर सरकारने जमा करावी. या आशयाचे निवेदन आज सायंकाळी ४ वाजता लातूर येथील सोयाबीन उत्पादक शेतकरी ॲड. वसंतराव उगले, देवाजी गोरे व अन्य शेतकऱ्यांचा समावेश असलेल्या शिष्ठामंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लातूरच्या जिल्हाधिकाऱ्या मार्फत दिले.

गरजु शेतकऱ्यांनी त्यांच्या गरजेसाठी सोयाबीन हे पुर्वीच विक्री केले आहे. जनतेच्या कल्याणाचा हेतू लक्षात घेवून सोयाबीनच्या विक्रीतून झालेल्या तुटीचा वाटा शेतकऱ्यांना मिळाल्यास त्याचा सर्व सोयाबीन शेतकऱ्यांना लाभ होईल, असे या निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर ॲड. वसंतराव उगले, ॲड. देवाजी गोरे, ॲड. उदय गवारे, ॲड. व्ही. डी. जाधव, ॲड. इंद्रजित गोरे, दगडू पडिले, शिवाजी सुरवसे,प्रा. दत्ता सोमवंशी, बाबासाहेब सीतापुरे, ॲड. भालचंद्र कवठेकर, ॲड. अरविंद रेड्डी, ॲड. सदाशिव मारडकर यांच्यासह शकडो शेतकऱ्यांच्या स्वक्षऱ्या आहेत.



संपादकीय...

## ऐतिहासिक सत्तांतर; समस्यांचा डोंगर

अनेक दशकांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर खऱ्या अर्थाने राष्ट्रीय प्रवाहाच्या महत्त्वावर विश्र्वास ठेवणाऱ्यांच्या दृष्टीने पश्र्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक सत्तांतर झाले आहे. साऱ्या देशात त्याबद्दल समाधान आणि आनंदाचे वातावरण आहे. पश्र्चिम बंगालमध्ये सत्तापालट झाल्यामुळे इतर राज्यांना त्याचा थेट फायदा होणार नाही, हे निश्र्चित. मात्र, वाढत्या घुसखोरीमुळे आव्हान बनलेल्या देशाच्या सुरक्षिततेच्या मुद्यामुळे पश्र्चिम बंगाल या सीमावर्ती राज्याकडे साऱ्या देशाचे लक्ष आहे. त्यामुळे नवे मुख्यमंत्री आणि नव्या सरकारकडून देशाच्याही अपेक्षा आहेत. पश्र्चिम बंगालमधील सत्तांतर अनेक दशकांच्या अस्वस्थतेनंतर घडले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस, कम्युनिस्ट आणि तृणमूल काँग्रेस असे तीन प्रकारचे सत्ताधारी पश्र्चिम बंगालने अनुभवले. यातील कोणत्याही सत्ताधारी पक्षाने पश्र्चिम बंगालचा विकास करण्यावर आणि त्या राज्याचा गौरवशाली इतिहास लक्षात घेता त्याला राष्ट्रीय प्रवाहाशी जोडण्यावर लक्ष दिले नाही. उद्योग-व्यवसायात पिछाडी आणि घुसखोरांसाठी आघाडी, असेच त्यांचे धोरण होते. खरे तर पश्र्चिम बंगाल हा भारताला दिशा दर्शन करणारा प्रदेश. इतिहास-संस्कृती याबाबत श्रीमंत असलेल्या याच प्रदेशातून एकेकाळच्या बहुतांशी सुधारणावादी चळवळी सुरू झाल्या.'वंदे मातरम'चे रचयिता बंकिमचंद्र चॅटर्जी आणि 'जन गण मन'चे रचयिता रवींद्रनाथ टागोर यांच्यासह अनेक थोर प्रतिभावंतांचे, विचारवंतांचे, समाजसेवकांचे, सुधारकांचे हे राज्य. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासारख्या विभूतींचे हे राज्य स्वातंत्र्योत्तर काळात बांगलादेशी घुसखोर मुसलमानांना जपणाऱ्या आणि त्यांना निवडणुकीसाठी मतपेटीच्या स्वरूपात वापरणाऱ्यां राजकीय पक्षांच्या ताब्यात राहिले. तेथे सत्तांतरे झाली तेव्हा सत्तेतले पक्ष बदलले, मुख्यमंत्री बदलले, पण घुसखोरांबद्दलचे धोरण कायम राहिले. गेल्या दीड दशकात ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील तृणमूल काँग्रेसने तर कहर केला. ममता बॅनर्जी सरकारने घुसखोरांना जणू भारतीय नागरिक बनविण्याचा चंग बांधला होता. पश्र्चिम बंगालमधील हिंदू समुदायात कधी नव्हे तेवढी असुरक्षिततेची भावना ममतांच्या काळात निर्माण झाली होती. आपण भारतात आहोत की बांगलादेशात, असा प्रश्र्न तिथल्या नागरिकांना पडत होता. नव्या मुख्यमंत्र्यांकडून केल्या जात असलेल्या अपेक्षांना ही पृष्ठभूमी आहे. पश्र्चिम बंगालला 'भारताचा पूर्वेकडील भारताचा दरवाजा' (गेटवे टू इस्टर्न-नॉर्थ इस्टर्न इंडिया) मानले जाते. पश्र्चिम बंगालमधील सिलिगुडी येथे अवघ्या २२ किमी रुंदीचा एक भाग आहे. त्याला चिकन नेक किंवा सिलिगुडी कॉरिडॉर म्हणतात. हा भाग उर्वरित भारताला आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोरम, मेघालय, त्रिपुरा आणि सिक्कीम या ईशान्येतील राज्यांशी जोडणारा एकमेव भूतल मार्ग आहे. पश्र्चिम बंगालच्या सीमा नेपाळ, भूतान आणि बांगलादेश या तीन देशांना लागून आहेत. बांगलादेश शेजारी असल्यामुळे तेथे घुसखोरीचा प्रश्र्न बराच आधीपासून आहे. गेल्या काही दशकांत भारताचा हा दरवाजा घुसखोरीवरील नियंत्रणाऐवजी सैल होत राहिला. बांगलादेशी मुसलमानांची घुसखोरी, मुजोरी हा पश्र्चिम बंगालच्या दृष्टीने जणू प्रश्र्नच नाही, इतका तो विषय तिथल्या राज्यकर्त्यांनी दुर्लक्षित ठेवला आणि आपल्या भूमिकेला मानवतावादाची लेबले लावली. अशा स्थितीत पश्र्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वातील सरकारने सर्वप्रथम सीमा व्यवस्थापन आणि बांगलादेशी मुसलमानांची घुसखोरी रोखण्यावर ठोस व कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला पाहिजे, ही देशाची अपेक्षा आहे. नेमका आकडा सांगता येत नसला, तरी बांगलादेशी घुसखोर मुसलमानांची संख्या फार मोठी आहे. १० वर्षांपूर्वी ती दोन कोटींच्या आसपास होती; आता ती निश्र्चितच तीन कोटींच्या वर गेली असावी. यातील मोजके लोक जरी भारतीय मतदार म्हणून निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभागी होत असतील तर आपल्या लोकतंत्राचे पावित्र्य भंग होते, हे कुणालाही कळावे. एसआयआरच्या माध्यमातून, कायद्याच्या चौकटीत राहून आणि मतदार याद्यांचे शुद्धीकरण करून या प्रश्र्नाचे गांभीर्य थोडेसे कमी करण्यात केंद्र सरकारने यश मिळविले. आता पश्र्चिम बंगालची पवित्र भूमी अशा घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलून पूर्णपणे शुद्ध करणे ही नव्या मुख्यमंत्र्यांची सर्वांत पहिली जबाबदारी आहे. कायद्याच्या चौकटीत राहून घुसखोरी संपविण्यात नव्या मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाची खरी कसोटी लागणार आहे. एरवी, असे विषय न्यायपालिकेकडे नेऊन वेगळे वातावरण निर्माण करणारे लोक आपल्याकडे कमी नाहीत. औदार्य, मानवता वगैरे गोष्टी घुसखोरांना लागू होत नाहीत. तरीही त्या नावाखाली आपला अजेंडा रेटणारे लोक कमी नाहीत. खरे तर राष्ट्रीय सुरक्षा हा राजकारणाचा विषय असू शकत नाही. निवडणुकीत एकमेकांचा विरोध होणारच. तो झालाही पाहिजे. पण, हा विरोध घुसखोरांना साथ देण्याच्या मुद्यावर केला जात असेल तर तो देखील राष्ट्रविघातकच. तसा तो केला गेला हा पश्र्चिम बंगालचा इतिहास आहे. औदार्याच्या भ्रमावर तिथल्या सत्ताधाऱ्यांनी पश्र्चिम बंगालच्या नागरिकांशी बनवाबनवीचा खेळ केला, हे आता लक्षात आले आहेच. या अनुषंगाने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वातील गृह खात्याने तसेच सुरक्षा दलांनी नक्षलवाद संपविण्यासाठी केलेली कामगिरी लक्षात ठेवण्याजोगी आहे. नक्षलवाद देखील पश्र्चिम बंगालमध्ये जन्मला आणि अनेक दशके त्याने त्या प्रदेशासह देशातील अन्य राज्यांमध्येही थैमान घातले,शींीं लरपसरश्र शश्रशलींळेप अमित शाह यांच्या निर्धारामुळे आणि रणनीतीमुळे नक्षलवादी चळवळीचा जवळजवळ निःपात झाला आहे. बांगलादेशी मुसलमानांच्या घुसखोरीचा प्रश्र्न आणि नक्षलवादाची तुलना करता येत नसली, तरी हे दोन्ही विषय राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहेत, हे नव्या मुख्यमंत्र्यांनी लक्षात घेतले पाहिजे. घुसखोरीचा त्रास केवळ पश्र्चिम बंगालपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो पश्र्चिम बंगालला लागून असलेल्या अनेक राज्यांमध्ये आहेच. शिवाय, मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्येही बांगलादेशी मुसलमान घुसखोर आढळून आले आहेत. राजकीय इच्छाशक्ती असेल तर परिवर्तन होते हे केंद्रीय गृहमंत्र्यांनी दाखवून दिले. पश्र्चिम बंगालच्या नव्या मुख्यमंत्र्यांना अगदी तशीच इच्छाशक्ती दाखवावी लागेल आणि घुसखोरांना कायमचे हुसकावून लावावेच लागेल. बांगलादेशी मुस्लिम घुसखोरांना त्यांच्या देशात परत पाठविण्याच्या संदर्भात काही कायदेशीर व राजनयिक अडचणी आहेत हे खरे. त्यातील प्रमुख अडचण म्हणजे एखाद्या घुसखोर व्यक्तीला तिच्या मायदेशी परत पाठवायचे असेल तर त्या मायदेशाने ती व्यक्ती आमची नागरिक आहे, हे मान्य केले पाहिजे. बांगलादेश तसे कधीही मान्य करीत नाही. नवे सरकार येत असल्याचे दिसताच घुसखोरांना परत पाठविण्याच्या संदर्भात बांगलादेशकडून इशारे देण्यात आले आहेत. त्या इशाऱ्यांचा अर्थ भारतीयांनी आणि विशेषतः पश्र्चिम बंगालच्या नव्या सरकारने समजून घेतला पाहिजे. राजनैतिक संबंध महत्त्वाचेच असतात. पण, प्रश्र्न असा आहे की, आपल्या घरात आपण शिस्त ठेवणार की बाहेरच्यांच्या मनावर आपल्या घरातली शिस्त ठरवणार...? आपल्या समाजातील शांततेला गालबोट लावण्याची आणि लोकतंत्राचे पावित्र्य भंग करण्याची संधी आपण सतत बांगलादेशी घुसखोरांना देत राहिलो तर काय परिणाम होतात, याचा अनुभव पश्र्चिम बंगालने दशकानुदशके घेतला. त्यामुळे नव्या मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट संदेश द्यायला हवा की, घुसखोरी कदापि सहन केली जाणार नाही. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी घुसखोरीच्या मुद्यावर आक्रमक आणि स्पष्ट भूमिका घेतली. पश्र्चिम बंगालच्या नव्या नेतृत्वानेही तशीच स्पष्टता दाखवली पाहिजे. पश्र्चिम बंगालातील बेरोजगारी, उद्योग, पायाभूत सुविधा हे प्रश्र्न तातडीचे आहेत, हे अमान्य करता येत नाही. त्याच वेळी देशभरात वाढलेली भावनाही समजून घ्यायला हवी. सीमा सुरक्षित हवी आणि कायद्याचे राज्य हवे, असे केवळ पश्र्चिम बंगालच्या नागरिकांना वाटत नाही. तसे देशभरातील भारतीय नागरिकांना वाटते. बांगलादेशातील हिंदूंचे हाल पाहिले तर त्याची तीव्रता कळते. नव्या सरकारला दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी काम करावे लागेल. एकावर लक्ष देऊन दुसरे दुर्लक्षित ठेवणे हा पर्याय नव्या मुख्यमंत्र्यांना उपलब्ध नाही. हा लढा एकट्या राज्याचा नसून साऱ्या देशाचा आहे. पण सुरुवात कुठून होणार, तर ती पश्र्चिम बंगालमधून. कारण तिथे समस्या सर्वाधिक तीव्र आहे. पश्र्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक परिवर्तन झाले. या ऐतिहासिक परिवर्तनाने पश्र्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी आणि त्यांच्या सरकारवर ही ऐतिहासिक जबाबदारी टाकली आहे. ती त्यांनी निभावली तर इतिहासाचे सुवर्णपान त्यांची नोंद घेण्यास आतूर आहे.

# जाती-धर्माच्या भिंती ओलांडून केजचा विकास

## हारुणभाई इनामदार आणि नगराध्यक्षा सिता बनसोड यांच्याकडून शेकडो नागरिकांना हक्काचे पी.टी.आर. आणि घरकुल सुपूर्द

## प्रतिकूल राजकीय परिस्थितीतही केजमध्ये विकासाची सत्ता; हारुणभाई इनामदारांच्या निधर्मी आणि पारदर्शक कारभाराची जिल्ह्यात चर्चा!

**केज/प्रतिनिधी :** केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाची (भाजप) भक्कम सत्ता असताना, स्थानिक पातळीवर कोणत्याही मोठ्या राजकीय राजआश्रयाशिवाय केज नगरपंचायतीमध्ये स्वतःच्या बळावर सत्ता आणणे आणि ती टिकवून ठेवणे, हे आजच्या राजकीय पटलावर थक्क करणारे आहे. सामाजिक नेते हारुणभाई इनामदार यांनी केज नगरपंचायतीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्र्न सोडवत आपले राजकीय वर्चस्व सिद्ध केले आहे. नुकत्याच झालेल्या पी.टी.आर., रमाई घरकुल आणि दिव्यांग निधी वाटप कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्या याच सर्वसमावेशक नेतृत्वाची चर्चा पुन्हा एकदा संपूर्ण बीड जिल्ह्यात रंगली आहे.

'मुस्लिम चेहरा, पण निर्णय सर्वसमावेशक' - शैक्षणिक संस्थांमधील वास्तव

हारुणभाई इनामदार हे मुस्लिम समाजातून येत असले, तरी त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील काम जाती-धर्माच्या पलीकडे जाणारे आहे. केज परिसरातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात सध्या एका गोष्टीची प्रकर्षाने चर्चा होत आहे, ती म्हणजे त्यांच्या शैक्षणिक संस्थांमधील कर्मचारी भरती.





एकीकडे अनेक हिंदू विचारसरणीच्या किंवा हिंदू नेत्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये विशिष्ट जाती-धर्माच्या लोकांना प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र दिसते; तर दुसरीकडे, हारुणभाई इनामदार यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लिम कर्मचाऱ्यांपेक्षा हिंदू समाजातील सुशिक्षित तरुणांना मोठ्या प्रमाणावर नोकरीच्या संधी देण्यात आल्या आहेत. हेच त्यांच्या निधर्मी आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनाचे सर्वात मोठे उदाहरण मानले जाते.

राजकीय राजआश्रयाचा अभाव, तरीही सत्तेवर पकड

सध्याच्या राजकीय परिस्थितीत अल्पसंख्याक समाजातील नेत्यांना मुख्य प्रवाहातील सत्ताधाऱ्यांकडून सहजासहजी राजकीय आश्रय किंवा पाठबळ मिळत नाही, हे उघड सत्य आहे. केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता असल्याने स्थानिक पातळीवर विरोधकांचे आव्हान व हिंदू-मुस्लिम जातीयवादाचे सावट मोठे होते. अशा तटस्थ आणि प्रतिकूल परिस्थितीतही हारुणभाई इनामदार यांनी कोणत्याही मोठ्या पक्षाच्या आश्रयावर अवलंबून न राहता, केजमधील बहुसंख्य (विशेषतः हिंदू) मतदारांचा विश्र्वास संपादन केला. आम्ही केवळ घोषणा करत नाही, तर काम करून दाखवतो, हा विश्र्वास त्यांनी इनामी जागेत राहणाऱ्या नागरिकांना पी.टी.आर. मिळवून देऊन आणि गोरगरिबांना रमाई घरकुल योजनेचा लाभ देऊन सार्थ ठरवला आहे.

**राजकारणातील दुटप्पीपणा: रात्री लोटांगण, सकाळी जातीयवादाची आरोळी!**

केजच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात एक अत्यंत विदारक आणि दुटप्पी चित्रही यानिमित्ताने समोर येत आहे. जे लोक उघडपणे हिंदू-मुस्लिम जातीयवाद करतात, समाजा-समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, तेच लोक रात्रीच्या अंधारात स्वतःच्या स्वार्थासाठी हारुणभाई इनामदार यांच्या दारात जाऊन नतमस्तक होतात. रात्री हारुणभाईंच्या घरी जाऊन आर्थिक लाभ लाटायचे, त्यांच्याकडून मदत घेऊन स्वतःला 'पावन' करून घ्यायचे आणि सकाळ उजाडताच मुसलमान माजला अशी जातीयवादी आरोळी ठोकून समाजात विष पेरायचे, असा दुटप्पी धंदा केजमधील काही संधीसाधू घटकांकडून सुरू असल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे. हा ढोंगीपणा केजच्या राजकीय संस्कृतीला काळिमा फासणारा ठरत आहे.

**सर्वधर्मीय मतदारांच्या बळावर केज नगरपंचायतीची सत्ता राखली**

जात आणि धर्माच्या राजकारणाला थारा न देता, हारुणभाईंनी केज शहरात 'कामाचे राजकारण' सुरू केले. त्यांच्या संस्थेतील पारदर्शकता आणि सर्व समाजाला सोबत घेऊन जाण्याची वृत्ती, याच जोरावर त्यांनी केज नगरपंचायतीमध्ये सत्ता स्थापन केली आणि ती टिकवूनही ठेवली. शहरातील इनामी जागेचा प्रश्र्न असो, गरिबांच्या हक्काच्या घरांचा विषय असो वा दिव्यांगांना मिळणारे आर्थिक साहाय्य असो; नगरपंचायतीच्या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्याचे काम नगराध्यक्षा सिता बनसोड आणि हारुणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे सुरू आहे. कोणतीही खोटी आश्र्वासने न देता, प्रत्यक्ष कृतीतून काम केल्यामुळेच केजच्या जनतेने जातीयवादी विचार नाकारून त्यांच्या पाठीशी आपली ताकद उभी केली आहे, हे या निमित्ताने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# नीट पेपरफुटी : शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरचा घाला

प्रवीण बागडे
नागपूर
मो. क्र. ९९२३६२०९१९

---

देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णय ठरवणारी आणि वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेशद्वार मानली जाणारी नीट परीक्षा आज गंभीर संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा केवळ एक शैक्षणिक प्रक्रिया नसून आयुष्य घडवणारा टप्पा असतो. परंतु, या परीक्षेत झालेल्या कथित पेपरफुटी, गुणांमधील संशयास्पद वाढ, परीक्षा केंद्रांवरील गैरव्यवस्था आणि संगनमताच्या आरोपांनी देशातील शिक्षण व्यवस्थेची विश्र्वासार्हताच डळमळीत केली आहे. ही केवळ एका परीक्षेची चूक नाही तर हा देशातील शिक्षण व्यवस्थेच्या नैतिक अधःपतनाचा आणि सरकारी यंत्रणांच्या अपयशाचा गंभीर इशारा आहे.




आजच्या काळात स्पर्धा परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी युद्धभूमीच बनली आहे. लाखो विद्यार्थी दोन-दोन, तीन-तीन वर्षे कठोर परिश्रम करून नीटची तयारी करतात. अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून, शेतकरी कुटुंबातून, आर्थिकदृष्ट्या कमकुवत परिस्थितीतून पुढे येतात. काहींचे पालक शेती विकतात, काही कर्ज काढतात, तर काही स्वतःच्या गरजा कमी करून मुलांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च करतात. विद्यार्थीदेखील मित्र, मनोरंजन, सण-उत्सव यापासून दूर राहून दिवसाचे १२ ते १४ तास अभ्यास करतात. अशा वेळी जर प्रश्र्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वीच बाजारात विकली जात असेल, तर मेहनतीवर उभ्या असलेल्या व्यवस्थेचा पाया कोसळल्याशिवाय राहत नाही.

नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरातील विद्यार्थ्यांच्या मनात एक धोकादायक प्रश्र्न निर्माण केला आहे, मेहनत करून खरंच यश मिळते का? हा प्रश्र्न केवळ भावनिक नाही तर तो शिक्षण व्यवस्थेच्या अस्तित्वाशी संबंधित आहे. जेव्हा पैशांच्या जोरावर प्रश्र्नपत्रिका मिळवणारे विद्यार्थी प्रामाणिक विद्यार्थ्यांपेक्षा पुढे जातात, तेव्हा गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि स्पर्धेतील समान संधी या लोकशाही मूल्यांचाच पराभव होतो. गरीब विद्यार्थी अभ्यास करतो आणि श्रीमंत व्यवस्था विकत घेतो, अशी भावना समाजात निर्माण होणे ही अत्यंत धोकादायक बाब आहे.

या प्रकरणात राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्र्न उपस्थित झाले आहेत. देशातील सर्वात महत्त्वाच्या परीक्षांपैकी एक असलेल्या नीट सारख्या परीक्षेची प्रश्र्नपत्रिका सुरक्षित ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असेल, तर ही बाब सामान्य नाही. डिजिटल इंडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, बायोमेट्रिक तंत्रज्ञान अशा आधुनिक सुविधांचा गजर करणाऱ्या देशात परीक्षा सुरक्षेतील एवढी मोठी त्रुटी कशी राहू शकते? प्रश्र्नपत्रिका छपाईपासून वितरणापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत जर गोपनीयता राखली जाऊ शकत नसेल, तर यंत्रणेत खोलवर भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणा शिरल्याचे स्पष्ट होते.

या संपूर्ण घोटाळ्यामागे केवळ काही विद्यार्थी किंवा दलाल नसून एक संघटित रॅकेट कार्यरत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही तपासांत दलाल, कोचिंग क्लासेस, स्थानिक अधिकारी आणि राजकीय संरक्षण असलेल्या टोळ्यांचे संगनमत असल्याचे आरोप समोर आले. शिक्षण हे ज्ञान, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे क्षेत्र असताना त्याला बाजारपेठ बनवण्याचा उद्योग सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. वैद्यकीय शिक्षणात प्रवेश मिळवण्यासाठी लाखो नव्हे तर कोट्यवधी रुपयांचे व्यवहार होतात, अशा चर्चा उघडपणे होत आहेत. ही परिस्थिती देशासाठी अत्यंत चिंताजनक आहे. कारण उद्या जर पैशाने प्रवेश मिळवलेले विद्यार्थी डॉक्टर बनले, तर त्याचा परिणाम केवळ शिक्षणापुरता मर्यादित राहणार नाही; तो थेट जनतेच्या आरोग्यावर होणार आहे.

पेपरफुटी प्रकरणाचा सर्वात गंभीर परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होत आहे. स्पर्धा परीक्षांचे दडपण आधीच प्रचंड असते. त्यात परीक्षा रद्द होईल का, पुन्हा परीक्षा घ्यावी लागेल का, निकालावर परिणाम होईल का, या अनिश्र्चिततेमुळे लाखो विद्यार्थी मानसिक तणावाखाली आले आहेत. अनेक विद्यार्थी नैराश्य, चिंता आणि भीती अनुभवत आहेत. देशाने यापूर्वी स्पर्धा परीक्षांच्या तणावामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्याही पाहिल्या आहेत. त्यामुळे अशा घटनांकडे केवळ प्रशासकीय किंवा कायदेशीर मुद्दा म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. ही पिढीच्या मानसिक सुरक्षिततेची बाब आहे. दुर्दैवाने, अशा गंभीर विषयांवरही राजकारण सुरू होते. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात व्यस्त असतात पण विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत ठोस भूमिका घेणारे फार कमी दिसतात. संसदेत गदारोळ होतो, पत्रकार परिषदांत आरोप होतात, चौकशांच्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात दोषींना शिक्षा होण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबते. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात मोठे लोक वाचतात आणि सामान्य विद्यार्थी भरडले जातात अशी भावना निर्माण होते. ही भावना लोकशाहीसाठी घातक आहे.

भारतात पेपरफुटीचे प्रकार नवीन नाहीत. विविध राज्यांतील भरती परीक्षा, पोलीस भरती, शिक्षक भरती, एमपीएससी, रेल्वे परीक्षा अशा अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये यापूर्वीही गैरप्रकार उघड झाले आहेत. म्हणजेच समस्या केवळ एका संस्थेपुरती मर्यादित नाही; ती संपूर्ण प्रणालीतील भ्रष्टाचार आणि कमकुवत नियंत्रण यंत्रणेची आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या संधी कमी असताना स्पर्धा वाढते, आणि त्यातूनच गैरप्रकारांचे जाळे अधिक मजबूत होत जाते. बेरोजगारी आणि स्पर्धेच्या भीषण दडपणात अडकलेल्या समाजात परीक्षा ही काहींसाठी व्यवसाय बनते, हे वास्तव नाकारता येणार नाही.

या परिस्थितीत सरकारने केवळ आश्र्वासने देऊन चालणार नाही. कठोर आणि परिणामकारक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम परीक्षा प्रक्रियेला पूर्णपणे तंत्रज्ञानाधारित आणि पारदर्शक बनवणे गरजेचे आहे. प्रश्र्नपत्रिकांची छपाई, वाहतूक आणि वितरणासाठी एंड-टू-एंड डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली लागू करावी. प्रत्येक टप्प्यावर जबाबदारी निश्र्चित करावी. परीक्षा केंद्रांवर बायोमेट्रिक पडताळणी, एआय-आधारित निरीक्षण, सायबर सुरक्षा आणि स्वतंत्र नियंत्रण कक्ष यांची अंमलबजावणी केली पाहिजे. प्रश्र्नपत्रिका गळतीसारख्या गुन्ह्यांना दहशतवादी किंवा आर्थिक गुन्ह्यांइतकीच गंभीर वागणूक देऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. याशिवाय, परीक्षा घेणाऱ्या संस्थांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्यासाठी कायमस्वरूपी स्वायत्त प्राधिकरण निर्माण करणे आवश्यक आहे. राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त आणि न्यायालयीन अधिकार असलेली स्वतंत्र यंत्रणा उभारली गेली तरच अशा प्रकरणांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल. चौकशी समित्यांच्या घोषणा करून प्रकरण दडपण्याची जुनी पद्धत आता थांबली पाहिजे. दोषींना जलदगती न्यायालयांतून शिक्षा झाली तरच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसेल.

विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचाही विचार तितकाच महत्त्वाचा आहे. शिक्षण म्हणजे केवळ गुणांची स्पर्धा नाही, तर व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे, हा संदेश समाजात पोहोचवणे गरजेचे आहे. पालकांनी मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकू नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अपयश स्वीकारण्याची ताकद द्यावी. सरकारने प्रत्येक जिल्ह्यात समुपदेशन केंद्रे सुरू करून स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसिक आधार उपलब्ध करून द्यावा. कारण परीक्षा महत्त्वाची असली तरी विद्यार्थ्यांचे जीवन त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती शिक्षण व्यवस्थेवरील विश्र्वास पुन्हा निर्माण करण्याची. विद्यार्थी जर व्यवस्थेवरच विश्र्वास ठेवेनासे झाले, तर देशाच्या प्रगतीचा पाया हादरेल. शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि समान संधी टिकवून ठेवण्यासाठी सरकार, न्यायव्यवस्था, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. अन्यथा मेहनतीपेक्षा पैशाला महत्त्व ही मानसिकता अधिक बळावेल आणि समाजातील नैतिक मूल्यांचे अधःपतन वेगाने वाढेल. नीट पेपरफुटी प्रकरण हे एका परीक्षेपुरते मर्यादित नाही; ते भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले आरसे आहे. त्या आरशात भ्रष्टाचार, निष्काळजीपणा, राजकीय हस्तक्षेप आणि व्यवस्थेतील ढासळलेली नैतिकता स्पष्ट दिसत आहे. या आरशाकडे डोळेझाक करून चालणार नाही. कारण आज जर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना रोखले नाही, तर उद्या देशाच्या भविष्यालाच मोठी किंमत मोजावी लागेल.

## संक्षिप्त...

### केज येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावी व बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के

**केज/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता दहावी व बारावीचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेमध्ये जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली आहे. माध्यमिक शालांत परीक्षेत अपर्णा भारत मदने हिने ९३.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण,कु.विद्या मेघराज घुले हिने ९२.८० टक्के गुणांसह द्वितीय तर चि. प्रसाद बाळासाहेब थोरात याने ९२.०० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.

कु. राऊत अमृता अभिमान हिने ९१.८० टक्के,कु.श्रुती रवींद्र घुले हिने ९०.६० टक्के गुण मिळवले.३८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीत ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत कु. माचवे धनश्री संतोष हिने ७८.०० टक्के गुणांसह प्रथम,चि. दराडे अशोक बाळू याने ७७.६७ टक्के गुणांसह द्वितीय तर कुमारी राऊत लक्ष्मी अंकुश हिने ७४.३३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून प्रथम श्रेणीत १४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

पत्रकार श्री तात्या गवळी यांची कन्या कु.गार्गी तात्या गवळी ही छचचड परीक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे तिचाही जीवन शिक्षण संकुलाच्या वतीने अभिनंदनपर सत्कार करण्यात आला.

संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार, संस्था सदस्य यासीन इनामदार, जीशान इनामदार प्राचार्य श्री.दत्तात्रय हंडीबाग,मुख्याध्यापक श्री. रमाकांत ढाकणे, बारावी विज्ञान शाखा प्रमुख श्री.हावळे सर , वस्तीगृह विभाग प्रमुख श्री.शिंदे सर ,बी.एससी विभाग प्रमुख श्री. साखरे सर ,बंसल क्लासेस चे प्रमुख ठोंबरे सर व सर्व कर्मचारीवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे, १६५२ वाड्यांमध्ये ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**मुंबई :** राज्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या असून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी शासनाने विविध जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे. दिनांक ११ मे ते १७ मे २०२६ दरम्यानच्या कालावधीतील अहवालनुसार राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १६५२ वाड्यांमध्ये एकूण ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या टँकरमध्ये ३३ शासकीय तर ६६९ खासगी टँकरचा समावेश आहे. वाढत्या तापमानामुळे विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीस्त्रोत कोरडे पडू लागल्याने अनेक ग्रामीण भागांमध्ये टँकर हा नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार ठरत आहे.

ठाणे विभागात सर्वाधिक १७७ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १५५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर नाशिक विभागात १५६ गावे आणि ४४४ वाड्यांसाठी १५९ टँकर कार्यरत आहेत. पुणे विभागात १४५ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १३१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात १३८ गावे आणि ६४ वाड्यांसाठी एकूण २४४ टँकर कार्यरत असून राज्यातील सर्वाधिक टँकर या विभागात वापरण्यात येत आहेत. अमरावती विभागात १७ गावांसाठी १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नागपूर विभागात सध्या कोणत्याही ठिकाणी टँकरची आवश्यकता भासलेली नाही.

राज्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा प्रशासन, ग्रामपंचायती आणि पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांना नियमित आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असून टँकर पुरवठ्याबरोबरच पर्यायी जलस्रोतांचा वापर, विहिरींचे अधिग्रहण आणि जलसाठ्यांचे नियोजन यावरही भर दिला जात आहे. आगामी काळात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### ट्रम्प यांच्या घोषणेनंतर चांदी १५०० रुपयांनी स्वस्त

**नवी दिल्ली :** भारतीय कमोडिटी बाजारात आज मंगळवार, १९ मे रोजी सोन्या-चांदीच्या किमतीत संमिश्र कल पाहायला मिळत आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्याच्या दरात किरकोळ वाढ झाली आहे. मात्र दुसरीकडे चांदीच्या भावात घसरण नोंदवली गेली आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील कारवाई पुढे ढकलल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाली. परिणामी डॉलरमधील कमकुवतपणाचा फायदा मौल्यवान धातूंना झाला. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर आज जूनच्या कराराची डिलिव्हरी असलेले सोने ०.१७ च्या किरकोळ वाढीसह १,५९,६७४ रुपये प्रति १० ग्रॅम या नव्या विक्रमी पातळीवर पोहोचले आहे.

यापूर्वी सोमवारी सोन्याचा बाजार १,५९,४०१ रुपयांवर बंद झाला होता. म्हणजेच गेल्या सत्राच्या तुलनेत सोन्यात सुमारे २७३ रुपये प्रति १० ग्रॅमची वाढ झाली आहे. सोन्याच्या उलट, चांदीच्या किमतीत आज नरमी दिसून आली. एमसीएक्सवर जुलैच्या कराराची डिलिव्हरी असलेली चांदी ०.६५ज्ञब ने घसरून २,७५,१६६ रुपये प्रति किलोवर आली आहे. सोमवारी चांदी २,७६,६५१ रुपयांवर बंद झाली होती, म्हणजेच आज चांदीच्या दरात सुमारे १४८५ रुपये प्रति किलोची घसरण झाली आहे.

कच्चे तेल आणि डॉलर इंडेक्समध्ये घसरण

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती २ टक्क्यांनी घसरल्या असून 'ब्रेंट क्रूड'चा भाव आता ११० डॉलर प्रति बॅरलच्या खाली आला आहे. ट्रम्प यांच्या भूमिकेमुळे भू-राजकीय तणाव निवळल्याने बाजाराला दिलासा मिळाला आहे. यासोबतच, जगातील ६ प्रमुख चलनांच्या तुलनेत डॉलरची ताकद मोजणारा 'डॉलर इंडेक्स' ०.२ज्ञब पेक्षा जास्त घसरला आहे. डॉलर कमजोर झाल्यामुळे इतर चलनांच्या धारकांसाठी आंतरराष्ट्रीय बाजारात सोने-चांदी काहीसे स्वस्त झाले आहे.सध्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिकेमुळे कच्च्या तेलाचे भाव नरमले आहे. परिणामी डॉलरवर दबाव आल्याने सोने-चांदीला आधार मिळत आहे.

# ड्रोन उडवण्याचे दर्जेदार प्रशिक्षण घ्या चक्क मोफत

## अधिकृत परवाना घेऊन सुरू करा व्यवसाय, खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बलांसाठी शासनाच्या अमृत संस्थेची योजना

**ठाणे/प्रतिनिधी :** शेती क्षेत्रापासून फोटोग्राफीपर्यंत विविध क्षेत्रांतील कामे अचूक आणि उत्तम पद्धतीने करण्यासाठी आज ड्रोनचा वापर केला जातो. हे ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी लाखो रुपये मोजावे लागतात; मात्र राज्य शासनाच्या एका योजनेअंतर्गत हे प्रशिक्षण चक्क मोफत दिले जाते. एवढेच नव्हे, तर प्रशिक्षणानंतर ड्रोन उडवण्याचा अधिकृत परवानाही दिला जातो. ही योजना अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे राबवली जात आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी अमृत संस्थेच्या जिल्हा कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा किंवा ऑनलाइन अर्ज भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



अमृत म्हणजेच महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी, त्यांच्यातून उद्योजक घडवण्यासाठी ही संस्था विविध योजनांसह वेगवेगळ्या प्रकारचे उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमही राबवते. त्यामध्येच ड्रोन पायलट बनण्यासाठीच्या प्रशिक्षणाचाही समावेश आहे. त्यासाठी अमृत ड्रोन मिशन या नावाने मोहीम राबवली जाते. हा प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत दर्जेदार असून, एरव्ही ज्यासाठी किमान लाख-दीड लाख रुपये मोजावे लागतात, तो १० दिवसांचा निवासी कोर्स अमृत संस्थेकडून लक्ष्यित घटकांसाठी मोफत राबवला जातो. या प्रशिक्षणाचा कार्यक्रमाचा लाभ आजपर्यंत शंभरहून अधिक लाभार्थ्यांनी घेतला असून, त्यातील काही जणांनी यातून प्राप्त केलेल्या कौशल्याच्या आधारे चांगली कमाई करण्यासही सुरुवात केली आहे. अमृत संस्थेच्या या दर्जेदार कोर्सची कीर्ती ऐकून गोवा सरकारने आपल्या तीस अधिकाऱ्यांना अमृत संस्थेकडून ड्रोनचे प्रशिक्षण दिले. राज्यात आठ ठिकाणी संस्थेतर्फे प्रशिक्षण दिले जाते.

ड्रोन ऑपरेटर (पायलट) प्रशिक्षण कार्यक्रमामुळे युवकांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअरच्या नव्या संधी खुल्या होत आहेत. ड्रोनच्या वापराची क्षेत्रे आज विस्तारली असून, शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, भूमापन (सर्व्हे), व्हिडिओग्राफी व फोटोग्राफी, सरकारी प्रकल्प निरीक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर केला जातो. त्यामुळे या क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे. हे नेमके ओळखून अमृत संस्थेने ड्रोन मिशनची सुरुवात केली.

महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना, विशेषत: ग्रामीण क्षेत्रात स्वयंरोजगार व रोजगार निर्मिती करणारे प्रशिक्षण देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.मुख्यत्वेकरून शेती क्षेत्रातील वापर, जमिनीचे सर्वेक्षण, एरियल फोटोग्राफी, आपत्ती व्यवस्थापन या विषयांमधून प्रशिक्षणाचा विषय या कोर्समध्ये निवडता येतो. नागरी विमान वाहतूक महासंचालनालय अर्थात 'डीजीसीए'ची सुरक्षित उड्डाण नियमावली, तसेच आधुनिक ड्रोन हाताळणी, ड्रोनचा मेन्टेनन्स वगैरे बाबींचे प्रशिक्षणही या कोर्समध्ये दिले जाते. प्रात्यक्षिक ज्ञानावर भर हे या कोर्सचे वैशिष्ट्य आहे. कोर्स कालावधीतील १० दिवसांची राहण्या-जेवण्याची व्यवस्था आणि खर्चही अमृत संस्थाच करते. कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर लाभार्थ्याला ड्रोन विकत घेऊन व्यवसाय सुरू करायचा असेल, तर अमृत संस्थेच्या कर्ज व्याजपरतावा योजनेचाही लाभ घेता येऊ शकेल.

कोण घेऊ शकते या योजनेचा लाभ?

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही शासकीय संस्था किंवा महामंडळाचा लाभ मिळत नाही अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक हा अमृत संस्थेचा लक्ष्यित गट आहे. त्यामध्ये ब्राह्मण, कायस्थ, कोमटी/वैश्य, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, नायर, नायडू, कम्मा, कानबी, सिंधी, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, लोहाना, हिंदू नेपाळी व भूमिहार अशा २५ जातींचा सद्यस्थितीत समावेश आहे. अशा जातींमधील वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या व्यक्ती अमृत संस्थेच्या योजनांचा लाभ घेऊ शकतात.

कार्यालय कुठे? अर्ज कसा करायचा?

पुण्यात औंधमध्ये अमृत संस्थेचे मुख्यालय आहे. तसेच, अमृत संस्थेची कार्यालये राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहेत. संस्थेचा कारभार पूर्णतः पारदर्शक असून, सर्व प्रक्रिया ऑनलाइन होते. त्यामुळे संस्थेचे कामकाज पेपरलेस आहे. योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांना थेट वेबसाइटवर अर्ज करावा लागतो.

ठाणे जिल्ह्यासाठी अधिक माहितीसाठी संपर्क : माया रत्नपारखी - खेत्रे : ९११२२२६५३३

नियम :

- उमेदवार वर दिलेल्या लक्ष्यित गटातील असावा आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- त्याचे वय १८ ते ५५ वर्षांदरम्यान असावे.
- उमेदवार किमान बारावी उत्तीर्ण असावा.
- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असावे.
- शेतकरी कुटुंबातील उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.
- अन्य सर्व कागदपत्रांसह वैद्यकीय अधिकाऱ्याकडून फिटनेस दाखला घेणे आवश्यक.

या योजनेविषयीची सविस्तर माहिती https://app.mahaamrut.org.in/amrut-new/scheme/245 या लिंकवर उपलब्ध असून, या लिंकवरूनच योजनेसाठी अर्ज करता येतो, असे महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) जिल्हा उपव्यवस्थापक, ठाणे माया रत्नपारखी-खेत्रे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# शेतकरी रडतोय...व्यापारी गल्ला भरतोय!



**ठाणे/प्रतिनिधी :** राज्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली असून शेतकऱ्यांकडून अवघ्या ८ रुपये किलो दराने कांदा खरेदी केला जात असताना ठाणे, मुंबई शहरातील मॉल आणि मोठ्या बाजारपेठांमध्ये हाच कांदा तब्बल ३४ रुपये किलो दराने विकला जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शेतकऱ्याच्या घामाला कवडीमोल भाव आणि मध्यस्थांच्या खिशात लाखोंचा नफा, अशी संतापजनक परिस्थिती निर्माण झाली आहे.

मागील कृषी उत्पन्न बाजार समितीत लाल कांद्याला सरासरी १,१०० रुपये प्रतिक्विंटल म्हणजेच ११ रुपये किलोने भाव मिळत आहे. तसेच लासलगाव बाजार समितीत लाल कांद्याला किमान ५००, तर कमाल १,३५६ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे. म्हणजे सरासरी मध्यम कांदा जो मॉलला पाठवला जातो तो ८ ते १० रुपये किलो प्रमाणे कांद्याचे बाजारभाव मिळत असतांना कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. ऋशेसीरहिळल ठशषशीशपलश

कांदा लागवडीसाठी बियाणे, खते, औषधे, मजुरी, वाहतूक आणि साठवणूक यासाठी हजारो रुपयांचा खर्च करणारा शेतकरी अखेर तोट्यात जात आहे. उत्पादन खर्चही निघत नसताना व्यापारी आणि मॉल चालक मात्र त्याच कांद्यावर चारपटहून अधिक दर आकारून मोठा नफा कमावत आहेत. त्यामुळे कष्ट शेतकऱ्याचे आणि पैसा दलालांचा? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

ग्राहकांकडून ३० ते ३४ रुपये किलो दराने पैसे घेतले जात असताना शेतकऱ्याला मात्र त्यातील अत्यल्प हिस्सा मिळत असल्याने कृषी बाजारव्यवस्थेतील मोठी दरी पुन्हा उघड झाली आहे. शेतकरी पिकवतो, ग्राहक भरमसाठ पैसे देतो; पण मध्येच कोणीतरी मालामाल होतो, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

दरम्यान, कांद्याच्या दरातील या तफावतीमुळे शेतकरी संघटनांनी संताप व्यक्त केला असून सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतमालाला हमीभाव द्यावा, मध्यस्थांची साखळी तोडावी आणि थेट शेतकरी-ग्राहक विक्री व्यवस्था मजबूत करावी, अशी मागणी केली आहे.

कांदा धोरण समिती नेमकी कुठे?

राज्यातील कांद्याच्या बाजारभावात स्थैर्य राखण्यासाठी तसेच शेतकरी, ग्राहक आणि व्यापाऱ्यांचे समतोल हित साधण्यासाठी स्थापन करण्यात आलेली राज्य शासनाची कांदा धोरण समिती नेमकी कुठे आहे असा संतप्त सवाल कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

# नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयची विदर्भात मोठी धडक!

## नागपूर अन् ब्रह्मपुरीत ३ विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे, सीबीआय सूत्रांचा मोठा खुलासा

**नागपूर/प्रतिनिधी :** देशभरात गाजत असलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणात मंगळवारी केंद्रीय गुन्हे अन्वेषण निभागाच्या पथकाने तीन विद्यार्थ्यांच्या घरी झाडाझडती घेतली. यात नागपुरातील दोन विद्यार्थीनीसह चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातील एका विद्यार्थ्याचा समावेश आहे.

निटच्या जीवशास्त्र आणि रसायनशास्त्राचे पेपर फुटल्या प्रकरणात सीबीआयच्या नवी दिल्ली येथील आर्थिक गुन्हे शाखेने गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात सीबीआयने आधीच लातूरमधील 'आरसीसी क्लासेस' या शिकवणी वर्गाचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला सोमवारी तााब्यात घेतले आहे.

दरम्यान केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाला पथकाला नागपुरातील काही विद्यार्थ्यांच्या भ्रमणध्वी क्रमांकाची माहिती मिळाली होती. त्या आधारे नवी दिल्लीतील पथकाने नागपुरातील पथकाच्या सहकार्याने नागपुरात शोध मोहीम राबवली. यात नागपुरातील दोन विद्यार्थीनिंसह चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातील एका विद्यार्थ्याच्या घरी पथकाने झाडाझडती घेत कागदपत्रे आणि काही नोट्स ताब्यात घेतल्या. त्या नोट्स आणि फुटलेल्या पेपरमध्ये काही साधर्म्य




आहे का हे सीबीआयीची टीम पडताळून पहात आहे.

नीट पेपरफूट घोटाळ्यात किमान एक हजार विद्यार्थ्यांनी हा पेपर खरेदी केल्याचा दाट संशय सीबीआयला आहे. त्यापैकी तीन विद्यार्थ्यांनी खरेदी केलेले पेपर हेच होते का, त्यांनी ते इतरांना पाठवले होते, का याचीही सीबीआयची टीम चौकशी करत आहे.

या घडामोडीत सीबीआयची पथके देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी शोध मोहीम राबवत आहे. त्यापैकी एक शोध मोहीम नागपूर आणि चंद्रपुरात राबवण्यात आली. विदर्भातील तीन विद्यार्थ्यांनी देखील हे पेपर खरेदी केल्याचा संशय सीबीआयला असून त्या दिशेने तपास केला जात आहे. मात्र पेपर फुटीचे केंद्र तुर्तास नागपूर नाही, असे सीबीआयमधील सुत्रांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# बोरीसावरगाव येथे विज्ञान आधारित कृषी निविष्ठा व्यवस्थापन जनजागरण अभियान उत्साहात संपन्न

**केज/प्रतिनिधी :** दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने केज तालुक्यातील बोरीसावरगाव येथे विज्ञान आधारित कृषी निविष्ठा व्यवस्थापन विषयक समग्र जनजागरण अभियानअंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वैजनाथ देशमुख होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाबीज अंबाजोगाईचे प्रक्षेत्र अधिकारी सचिन सोनवणे, कृषि विज्ञान केंद्राचे पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप सांगळे, कृषि अभियंता प्रमोद रेणापूरकर तसेच सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती डांगे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कृषि अभियंता प्रमोद रेणापूरकर यांनी आगामी खरीप हंगामाच्या पार्श्र्वभूमीवर शेतीमधील बियाणे, खते व औषधे यांसारख्या कृषी निविष्ठांचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी ट्रॅक्टरचा सुयोग्य वापर, सुधारित बैलचलित अवजारांचा वापर तसेच कार्यक्षम ऊर्जा वापर याविषयी जनजागृती करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, खरीप हंगामामध्ये बियाणे, खते व तननाशकांमध्ये बचत करून शाश्र्वत उत्पादन वाढीसाठी रुंद वरंबा-सरी टोकण यंत्राचा वापर, बैलचलित सौर आधारित फवारणी यंत्र, ट्रॅक्टरचलित फवारणी यंत्र तसेच ड्रोनद्वारे फवारणी यांसारख्या आधुनिक यांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे.

महाबीजचे प्रक्षेत्र अधिकारी सचिन सोनवणे यांनी महाबीजच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या बीजोत्पादन कार्यक्रमाची माहिती देताना शेतकऱ्यांना बीजोत्पादनाद्वारे शेतीतील उत्पन्न वाढविण्याचे आवाहन केले. प्रत्येक गावामध्ये किमान २५ एकर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रावर बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्यासाठी महाबीजकडून सहकार्य करण्यात येत असून त्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप सांगळे यांनी जैविक खते व जैविक औषधांच्या वापराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

आगामी खरीप हंगामासाठी बीजप्रक्रियेस उपयुक्त विविध निविष्ठा कृषि विज्ञान केंद्रावर उपलब्ध असून शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.




सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती डांगे यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे सांगितले. कार्यक्रमास गावातील युवक, प्रगतिशील शेतकरी व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपचे लातुरातील आंदोलन म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा

## काँग्रेस शहरजिल्हाध्यक्ष किरण जाधव यांचा घणाघात

**लातूर/प्रतिनिधी** : ''केंद्रात आणि राज्यात स्वतःची पूर्ण बहुमताची सत्ता असताना, गेल्या १०-१२ वर्षांत देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या पेपरफुटीच्या घटना रोखण्यात पूर्णपणे अपयशी ठरलेल्या भाजपने आज लातुरात काँग्रेस भवनसमोर आंदोलन करण्याचा केलेला अयशस्वी प्रयत्न म्हणजे निव्वळ चोराच्या उलट्या बोंबा आहेत,'' अशी घणाघाती टीका लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड.किरण जाधव यांनी केली आहे. भाजपच्या या नौटंकी आंदोलनाचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. भाजपने आज नीट () पेपरफुटीच्या मुद्द्यावरून लातूर येथील काँग्रेस भवनसमोर आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. या राजकीय नौटंकीचा समाचार घेताना काँग्रेस शहराध्यक्ष किरण जाधव यांनी भाजपच्या दुटप्पी भूमिकेवर कडाडून हल्ला चढवला. ॲड.किरण जाधव म्हणाले की, ''परीक्षा असो की इतर कोणत्याही केंद्रीय परीक्षा, या सर्व परीक्षांचे नियोजन, सुरक्षा आणि नियंत्रण थेट केंद्र सरकारच्या अखत्यारीत येते. संपूर्ण देशात पेपरफुटीचे रॅकेट उघड होत असताना आणि केंद्रीय यंत्रणा अपयशी ठरलेली असताना, मूळ आरोपींना आणि शिक्षण क्षेत्रातील माफियांचे वरदहस्त शोधून काढण्याऐवजी भाजप स्वतःच रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची नौटंकी करत आहे. स्वतःचे पाप लपवण्यासाठी आणि अपयश झाकण्यासाठी दुसऱ्यांकडे बोटे दाखवण्याचा हा भाजपचा केविलवाणा प्रयत्न आहे.'' भाजपा चे नीट विधार्थ्यांवरील प्रेम म्हणजे पुतणा मावशीच्या प्रेमा सारखे आहे, भा ज पा आमदारांचे क्लासेस मधे हितसंबंध असल्याचे सर्वजण जाणून आहेत, लातूरच्या शैक्षणिक वारशावर बोलताना जाधव यांनी संताप व्यक्त केला. ''लातूरने आपल्या कठोर परिश्रमाच्या आणि गुणवत्तेच्या जोरावर शिक्षण क्षेत्रात संपूर्ण देशात एक वेगळा नावलौकिक मिळवला आहे. मात्र, भाजप आणि त्यांच्याशी संबंधित हितसंबंधी लोक जाणीवपूर्वक लातूरच्या या पवित्र शिक्षण पॅटर्नला आणि इथल्या काँग्रेसच्या राजकीय नेतृत्वाला बदनाम करण्याचे पद्धतशीर षड्यंत्र रचत आहेत. पण लातूरची सुजाण जनता भाजपचा हा कुटील डाव चांगल्या प्रकारे ओळखून आहे,'' असे ते म्हणाले.

### सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना जाब विचारणे हा लोकशाहीतील विनोद!



देशातील एकूणच परीक्षा पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत ते पुढे म्हणाले, ''गेल्या काही वर्षांत देशात केंद्रीय परीक्षांच्या पेपरफुटीची मालिकाच सुरू आहे. यामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या गरीब, शेतकरी आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांच्या कष्टावर पाणी फेरले जात आहे. अशा अत्यंत गंभीर परिस्थितीत कडक कारवाई करून दोषींना तुरुंगात टाकण्याऐवजी, सत्ताधारी भाजप रस्त्यावर उतरून उलट विरोधी पक्षाला जाब विचारत आहे, हा लोकशाहीतील सर्वात मोठा विनोद आहे. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना जाब विचारण्याऐवजी देशातील कोट्यवधी हतबल विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना उत्तर द्यावे.''

''काँग्रेस पक्ष हा नेहमीच विद्यार्थ्यांच्या, तरुणांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी खंबीरपणे उभा राहिला आहे आणि पुढेही राहील. भाजपच्या असल्या दबावाच्या आणि नौटंकी राजकारणाला आम्ही अजिबात घाबरणार नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या खऱ्या गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या भाजपचा बुरखा आम्ही लातूरकरांसमोर आणि देशासमोर पूर्णपणे फाडल्याशिवाय राहणार नाही,'' असा इशाराही ॲड.किरण जाधव यांनी शेवटी दिला

## शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती दूर करण्याची कार्यवाही करा : कृषि मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील कृषि क्षेत्राच्या डिजिटलायझेशनसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई विधानसभा मतदारसंघातील शेतक-यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती संबधित सर्व यंत्रणांनी दूर कराव्यात, असे निर्देश कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

विधानसभा सदस्य विजयसिंह पंडीत यांनी शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती दूर करण्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती यासंदर्भात बैठकीत कृषि मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी आमदार विजयसिंह पंडित, सचिव परिमल सिंह, व्हिसीव्दारे कृषि आयुक्त सूरज मांढरे,ॲग्रीस्टॅकचे संचालक अंकुश माने, उपसचिव श्रीकांत आंडगे, यासह बीड जिल्ह्यातील अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

कृषि मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, गेवराई विधानसभा मतदार संघातील फार्मर आयडी संदर्भातील त्रुटींवर तातडीने संबधित सर्व कार्यान्वयिन यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. शेतकऱ्यांच्या ८ अ उताऱ्यावरील क्षेत्राची नोंद फार्मर आयडीवर घ्यावी. मोबाईल नंबर जर चुकीचा असल्यास त्यात दुरूस्ती करावी.ज्या शेतक-यांच्या नावावर जमीन आहे त्याचेच क्षेत्र नोंद करावी. या तांत्रिक अडचणी दूर करून लवकरात लवकर या परिसरातील शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवावा.या अडचणी सोडविण्यासाठी विशेष कॅम्पचे सर्व विभागांच्या समन्वयातून शिबीर आयोजित करून प्रश्न सोडवावा असे निर्देश त्यांनी दिले.

## तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू

**चंद्रपूर/प्रतिनिधी** : नागभीड तालुक्यातील किटाडी मेंढा परिसरातील हनुमान मंदिराजवळील जंगलात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या महिलेचा वाघाच्या हल्लूयात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवार १९ मे रोजी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत महिलेचे नाव इंदिरा उईके असे असून त्या सकाळी तेंदूपत्ता संकलनासाठी जंगल परिसरात गेल्या होत्या. सकाळी साडेआठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास हनुमान मंदिर परिसरातील जंगलात दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्लूयात त्या गंभीर जखमी झाल्या आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी आणि स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्राम ीण रुग्णालयात पाठविण्यात आला. वन विभागाकडून परिसरात शोधमोहीम राबविण्यात येत असून नागरिकांना जंगल परिसरात जाताना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, नागभीड तालुक्यात अलीकडच्या काळात वाघांच्या हालचाली वाढल्या असून, जंगलालगतच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तेंदूपत्ता हंगाम सुरू असल्याने मोठ्या संख्येने नागरिक जंगलात जात आहेत. त्यामुळे वन विभागाने सुरक्षा उपाययोजना अधिक प्रभावी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## रेबीजग्रस्त आणि गंभीर आजारी कुत्र्यांना मारण्यास परवानगी; सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

नवी दिल्ली :सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या पुनर्वसन आणि नसबंदी संदर्भातील ७ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशामध्ये बदल करण्याची तसेच तो आदेश मागे घेण्याची मागणी करणाऱ्या सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत. तसेच भारतीय पशु कल्याण बोर्डाने (अँघ) भटक्या प्राण्यांबाबत जारी केलेल्या मानक कार्यपद्धती च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकाही न्यायालयानं नामंजूर केल्या. न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारियायांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

सर्वोच्च न्यायालयानं युक्तिवाद फेटाळून लावले : सर्वोच्च न्यायालयानं शैक्षणिक संस्था, बसस्थानकं, रेल्वे स्थानकं, क्रीडा संकुले, रुग्णालयं आणि इतर सार्वजनिक ठिकाणांवरून भटक्या कुत्र्यांना हटवण्याबाबत यापूर्वी दिलेल्या निर्देशांमध्ये कोणताही बदल करण्यास नकार दिला. तसेच नसबंदी केल्यानंतर कुत्र्यांना पुन्हा त्याच ठिकाणी सोडण्याचे निर्देश देण्यासही न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. या निर्णयामुळे भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनाबाबत स्थानिक प्रशासन आणि संबंधित संस्थांना सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या आदेशांनुसारच कार्यवाही करावी लागणार आहे.

आपल्या याचिकेत, श्वानप्रेमींनी असा युक्तिवाद केला की, सार्वजनिक ठिकाणांहून भटक्या कुत्र्यांना हटवण्याचा आदेश हा अत्यंत कठोर असून, त्याम ुळे कुत्र्यांच्या अधिकारांचे उल्लंघन होतं. त्यांनी प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रम अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. तथापि, सर्वोच्च न्यायालयानं जनहित आणि सार्वजनिक सुरक्षेला प्राधान्य देत, हे युक्तिवाद फेटाळून लावले.

सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली : आपली नाराजी व्यक्त करताना, सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या हाताळण्यासाठी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून दीर्घकाळापासून कोणतेही ठोस प्रयत्न करण्यात आलेले नाहीत. न्यायालयाने असे नमूद केले की, 'प्राणी जन्म नियंत्रण' यंत्रणेची योग्य प्रकारे अंमलबजावणी झालेली नाही आणि त्यासाठी वाटप करण्यात आलेला निधी अपुरा व असमतोल राहिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, ''सन्मानाने जगण्याच्या अधिकारात, कुत्र्यांकडून होणारे हल्ले किंवा धोक्यांच्या भीतीशिवाय, मुक्तपणे जगण्याचा लोकांचा अधिकार अंतर्भूत आहे.''

## प्रा. मोटेगावकरच्या पिंपरीतील 'आरसीसी'च्या शिकवणी वर्गाच्या फलकाची तोडफोड

पिंपरी : वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या राष्ट्रीय पात्रता तथा प्रवेश परीक्षेतील (नीट) पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेले आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या पिंपरीतील शिकवणी वर्गाच्या आरसीसी फलकाची संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी तोडफोड केली. फलकाला काळे फसले. संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पुणे जिल्हा कार्याध्यक्ष भैय्यासाहेब गजधने, ब्रह्मानंद जाधव, प्रसाद दौंडकर आंदोलनात सहभागी झाले होते. पेपरफुटी प्रकरणात आरसीसी क्लासेसचे संस्थापक प्रा. शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने अटक केल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. मोटेगावकर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध कोचिंग संस्थांपैकी एक असलेल्या आरसीसीचे प्रमुख आहेत. लातूर पॅटर्नमधील मोठे नाव म्हणून त्यांची ओळख होती. मात्र, पेपरफुटी प्रकरणात त्यांचे नाव समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे संभाजी ब्रिगेडने म्हटले आहे. ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी शहरातील आरसीसी संबंधित फलक फोडून निषेध नोंदवला. 'विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना माफी नाही', 'शिक्षण क्षेत्रातील माफियांवर कठोर कारवाई करा', अशा घोषणा देण्यात आल्या. सतीश काळे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, लाखो विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा देतात. मात्र पैशांच्या जोरावर पेपरफुटी करून काही जण विद्यार्थ्यांचे भविष्य उद्धवस्त करत आहेत. अशा प्रवृत्तींचा निषेध म्हणून हे आंदोलन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात; प्रशासनाकडे धाव, समस्त लातूरकरांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन



**लातूर/प्रतिनिधी** : NEET 2026 परीक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून, या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी शासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करणारे निवेदन मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, NEET 2026 पेपरफुटी प्रकरणाची चौकशी सध्या CBI मार्फत सुरू असून विद्यार्थ्यांमध्ये भीती, नैराश्य आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे बाधित विद्यार्थ्यांचे पुनर्वसन करून त्यांच्या शैक्षणिक व मानसिक नुकसानभरपाईसाठी विशेष योजना जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच NEET परीक्षा घेणारी NTA समिती तात्काळ बरखास्त करून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. पेपरफुटीमुळे मानसिक तणावाखाली गेलेल्या विद्यार्थ्यांसाठी तातडीने समुपदेशन केंद्र सुरू करावे, तसेच शासनामार्फत स्वतंत्र टोल-फ्री हेल्पलाईन सुरू करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यासोबतच प्राध्यापक शिवराज मोटेगावकर संचालित क्लास मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क परतावा देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या क्लासेसवर कायमस्वरूपी बंदी घालून संबंधित गुन्हेगारांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.

## नसरापूर अत्याचार प्रकरणाची जलदगतीने सुनावणी, २१ मेपासून दररोज सुनावणी

**पुणे/प्रतिनिधी** : नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याच्याविरुद्ध चौदा दिवसात आरोपपत्र दाखल करण्यात आल्यानंतर आता या प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहेत. या प्रकरणाची सुनावणी येत्या २१ मेपासून पुण्यातील विशेष न्यायालयात दररोज होणार आहे.

महाराष्ट्र दिनी भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षाच्या बालिकेवर अत्यचाार करुन तिचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेचे संतप्त पडसाद पुणे शहर, तसेच राज्यात उमटले होते. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करुन भीमराव कांबळे (वय ६५) याला अटक केली. गुन्हा घडल्यानंतर पोलिसंनी सखोल तपास करुन आरोपी कांबळे याच्याविरुद्ध विशेष न्यायालयात ११०० पानी आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्र न्यायवैद्यक अहवाल, सीसीटीव्ही चित्रीकरण, तांत्रिक पुरावे, तसेच शवविच्छेदन अहवाल, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब जोडण्यात आले आहेत. नसरापूर अत्याचार प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेऊन आरोपीला कठोर शिक्षा करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते.

'नसरापूर अत्याचार प्रकरण संवेदनशील आहे. या प्रकरणाची सुनावणी येत्या २१ मेपासून दररोज घेण्यात येणार आहे. खटला जलदगतीने चालविण्यात येणार आहे.' अशी माहिती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी दिली. या प्रकरणात मिसर यांना सुरेश गायकवाड, प्रमेश शिगणे हे सहाय करणार आहेत. मिसर हे २००० पासून सरकारी वकील म्हणून काम पाहत आहेत. विविध गंभीर गुह्यांच्या खटल्यात त्यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले आहे.

सुनावणी 'इन कॅमेरा' ?

नसरापूर अत्याचार प्रकरणाची सुनावणी दररोज होणार आहे. ही सुनावणी बंद खोलीआड (इन कॅमेरा) होणार आहे. पीडित बालिकेच्या कुटुंबीयांची ओळख न पटू देणे, तसेच संवेदनशील बाबी विचारात घेऊन न्यायालयाकडून आवश्यक ती काळजी घेण्यात येणार आहे. आरोपीला दररोज कडक बंदोबस्तात न्यायालयात हजर केले जाणार आहे.

न्यायालयीन सुनावणी जलदगतीने पूर्ण करुन आरोपीला कठो शिक्षा होण्यासाठी शासन, तसेच पोलीस प्रयत्नशील आहेत.

## पेट्रोल-डिझेलच्या भावात चार दिवसांत दुसऱ्यांदा वाढ

**मुंबई/प्रतिनिधी** : अवघ्या चार दिवसात पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलच्या दरात हे ९१ पैशांनी तर डिझेलच्या दर ९४ पैशांनी वाढ करण्यात आली आहेत. त्यामुळे मुंबईतील पेट्रोलच्या दर थेट १०७.४९ तर डिझेलचा भाव प्रति लिटर ९४.०२ रुपयांच्या घरात पोहोचला आहे. १५ तारखेला पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत तीन रुपयांनी वाढ करण्यात आली होती आणि आता अवघ्या चार दिवसांत पुन्हा एकदा दरवाढ करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण होण्याची शक्यता आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच आता पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. मंगळवारी सकाळपासून हे नवे दर लागू झाले आहेत.

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निकालापूर्वीच ४० विद्यार्थ्यांना दिले थेट नियुक्तीपत्र

**लातूर/प्रतिनिधी** : फार्मसी क्षेत्रात करियर घडवण्याची संधी मिळावी म्हणून दयानंद शिक्षण संस्था,लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे हैद्राबाद येथील मेडप्लस फार्मसी कंपनी मार्फत कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित केले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी केले. महाविद्यालया तर्फे फार्मसी क्षेत्रात करियर घडवण्याची संधी मिळावी या करिता कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित केले होते आणि इंटरव्ह्यू करिता महाविद्यालयातील १३० विद्यार्थी सहभागी होते यामधून एकूण ४० विद्यार्थ्यांची विविध पदावर निवड करून निकाला पूर्वीच थेट नियुक्ती पत्र देण्यात आले. नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक तीन ते साडेतीन लाखांचे पॅकेज दिले जाणार आहे. या कॅम्पस इंटरव्ह्यू करिता तज्ञ म्हणून निलेश संभरकर (असिस्टंट मॅनेजर एच.आर.), दिपककुमार झा (असिस्टंट मॅनेजर ऑपरेशन्स), अंकोश राठोड ( सुपरवाईजर ऑपरेशन्स), अस्जद मनियार (सुपरवाईजर ऑपरेशन्स) यांची प्रमुख उपस्थिती होती. कंपनी बद्दल माहिती देताना निलेश संभरकर यांनी मेडप्लस ही एक भारतीय फार्मसी रिटेल चेन आहे.ज्याचे मुख्यालय हैदराबाद येथे आहे. मेडप्लस ही भारतातील दुसरी सर्वात मोठी फार्मसी साखळी आहे,जी जून २०२५ च्या अखेरी पर्यंत ७३०+ शहरांमध्ये ४७०० पेक्षा अधिक फार्मसी स्टोअर्स चालवते. २०२५२६ मध्ये कंपनीची आर्थिक वाढ चांगली दिसून आली आहे. डिसेंबर २०२५ कंपनीची विक्री ₹१८०६ कोटींवर पोहोचली असून नफ्यातही सुमारे २६% वाढ झाली. मेडप्लस प्रिस्क्रिप्शन आणि ओटीसी औषधे,एफएमसीजी उत्पादने,जीवनसत्त्वे आणि इतर पोषण पूरक आणि ऑप्टिकल्स विकते अशी माहिती दिली तसेच मेडप्लस फार्मसी कंपनी व त्या मधील विविध कामे आणि त्या त्या पदाची जबाबदारी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी स्वप्नाली केंद्रे तर आभार प्रदर्शन प्रा.रोहित सारडा यांनी केले.या




कॅम्पस इंटरव्ह्यूच्या यशस्वीते करिता प्रा.रोहित सारडा,डॉ.तनुजा वारद यांनी सूत्रबद्ध नियोजन करत परिश्रम घेतले. अशा या उपयुक्त उपक्रमाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.